# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०६८ /२००९

अर्जदार : श्री संजय चिधुंजी मनोहरे
राहणार धम्मनगर,
आयबिएम रोड,
गिटटीखदान, नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
सिव्हील लाईन विभाग,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश ——

पारीत दि. ०३.०२.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी सदर तक्रार अर्ज दिनांक 14.12.2009 रोजी महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

तक्रार कर्ता हा गैर अर्जदाराचा अधिकृत ग्राहक असुन त्याला जास्तीचे विज बिल देण्यात आले आहे. त्याचे कडे विजेचे कमी वापर असुनही जास्तीचे विज बिल देण्यात आले.

तक्रार कर्त्याने दिनांक 14.07.2009 ला अतंर्गत तक्रार निवारण कक्षात तक्रार दिलेली होती. परंतु त्याचा विचार करण्यात आला नसुन त्याला बिल कमी करून देण्यात आले नाही.

गैरअर्जदाराने आपले मुद्यानिहाय उत्तर दिनांक 29.12.2009 व 01.01.2010 रोजी मंचात दाखल केलेले आहेत. गैरअर्जदाराने दिनांक 01.01. 2010 रोजी उत्तरात असे म्हटले आहे की दि. 31.12.2009 ला मीटर तपासणी केले असता ग्राहकाची कीती उपकरणे आहेत याची तपासणी केली वरील तपासणी पत्रकावरून प्रतीमहा 28 युनिट प्रमाणे 24 महीन्याचे बिल दुरूस्त करून देण्यात येईल, आणि पुर्वी चुकीचे दिलेले बिल सुधारीत करून देण्यात येईल असे म्हटले आहे.

मंचाने दोन्ही पक्षाचे म्हणने एकुण घेतले, विज मीटर तपासणी पत्रक दोन्हीही तक्रार कर्त्यास मान्य आहे, तसेच प्रतिमहा 28 युनिटचा वापरही त्याने मान्य केला आहे. त्याप्रमाणे अर्जदारास 28 युनिटप्रमाणे 24 महिन्याचे बिल देण्यात यावे.

गैरअर्जदाराने उत्तरात म्हटल्याप्रमाणे तक्रारकर्त्यास सुधारीत विज बिल दयावे.

सुनावणीकर्ते वेळी दोन्ही पक्षाचे म्हणणे विचारात घेतल्यावर तक्रारकर्त्याची अडचण दुर झालेली आहे असे दिसुन येते.

# <u>आदेश</u>

ग्राहकाचे गा–हाणे अंशतः मंजुर करण्यात येते.

गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे की तक्रारकर्त्याचे बिल दुरूस्त करून आदेश पारित केल्याच्या तारखेपासुन 30 दिवसांचे आंत कार्यवाही बदद्लचा अहवाल या कार्यालयात पाठविण्यात यावा.

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या

सही/–
(श्रीमती मीरा खडक्कार)
सभापती

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM
**MAHARASHTRA STATE ELECTRICITY DISTRIBUTION CO LTD's**
NAGPUR URBAN ZONE, NAGPUR.